# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/क्यारवमहानुकसानग्रस्त/ ३५९२ दिनांक : २७.१२.२०१९

**अत्यंत महत्वाचे / हस्तपोहोच**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...**

संदर्भ : - १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र. एएफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३.
२. महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र २२०/म-७, दि. ३१.१०.२०१९.
३. महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र १९१/म-३, दि. १८.११.२०१९.
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. शुल्क-५२१९/प्र.क्र ३११/मशि-२, दि. २१.११.२०१९.
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६ दि.२२.११.२०१९.
६. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/क्यारवमहानुकसानग्रस्त/दि. १२.१२.२०१९
७. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१६५१५ दि.२६.१२.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन राज्यातील दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे प्रस्तुत कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ६ नुसार अद्यापही महाविद्यालयांची माहिती अप्राप्त आहे.

**उच्च शिक्षण संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्र ७ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदर पत्रानुसार नुकसानग्रस्त भागातील विद्यार्थ्यांकरीता परीक्षा शुल्क माफीसाठी सुधारित पात्रता नियम कळविण्यात आले आहेत. विवरणपत्र - अ, ब, क व ड ची अचूक माहिती आणि संदर्भिय पत्र क्र १० नुसार सोबत जोडलेले प्रमाणपत्र व संबंधित विद्यार्थी दुष्काळ घोषित केलेल्या/अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र व संबंधित विद्यार्थ्यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र तात्काळ हार्ड कॉपी आणि विद्यार्थ्यांच्या यादीचे विवरणपत्र सॉफ्ट कॉपी (फक्त मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅट आणि इंग्लिश TIMES NEW ROMAN FONT मध्येच हस्तपोहोच जमा करावे) द्वारे सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे कार्यालयात संबंधित कर्मचाऱ्याने तपासून जमा करावी.** तसेच ज्या महाविद्यालयांनी सदर माहिती सादर केली आहे. त्या सर्व महाविद्यालयांनी सुधारित यादीनुसार सर्व कागदपत्र तातडीने खालीलप्रमाणे नमूद केलेल्या दिवशी आणि वेळेतच सादर करावे.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | जिल्हा | सादर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | पुणे जिल्हा | दि. १.०१.२०२० सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० |
| २ | अहमदनगर जिल्हा | दि. २.०१.२०२० सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० |
| ३ | नाशिक जिल्हा | दि. ३.०१.२०२० सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० |

**सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सदर माहिती अतितात्काळ हस्तपोहोच जमा करावी.** जेणेकरुन सदर प्राप्त माहिती सदर माहिती आणि कागदपत्र मा. संचालनालयास अचूक आणि परिपूर्ण सादर करता येईल. त्यानंतर सदर माहिती आवक-जावक विभागामध्ये जमा केल्यास अथवा स्पीड पोस्ट/कुरिअर/टपालाद्वारे पाठविल्यास सदर महाविद्यालयाची/संस्थेची/विद्यापीठाची माहिती विचारात घेतली जाणार नाही.

(हरिविजय शिंदे)
प्रशासन अधिकारी
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत –संचालनालयाचे संदर्भ क्र. ७ पत्र.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या / अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

सोबत विद्यार्थ्यांची यादी जोडलेली असून परीक्षा शुल्क माफीची रक्कम रुपये एवढी आहे.

स्वाक्षरी

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३


क्र.उशिसं-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती /16515 दिनांक-२६/१२/२०१९.

ईमेलद्वारा

26 DEC 2019

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

विषय- दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १ शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३
२ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१९/प्र.क्र.२२०/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९.
३ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.सीएएस २०१९/प्र.क्र.१९१/म-३, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९.
४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क-५२१९/प्र.क्र.३११/मशि-२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९.
५ संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६, दि.२२/११/२०१९.

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, जून ते सप्टेंबर या कालावधीत पर्जन्य तूट व अनुषांगिक बाबीमुळे प्रभावित झालेल्या आंबेजोगाई, जि.बीड व परांडा, जि.उस्मानाबाद या दोन तालुक्यामध्ये दुष्काळ घोषित केलेला असुन परीक्षा शुल्क माफीची सवलत लागू केलेली आहे. तसेच राज्यात माहे ऑक्टोंबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमध्ये शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतक-यांना मदत व सवलतीमंध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीची सवलत लागू केलेली आहे. तरी परीक्षा शुल्क माफ करणेबाबतच्या महाविद्यालये/विद्यापीठ यामधील पात्र विद्यार्थ्यांची यादी व संबंधित विद्यार्थ्यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र व संबंधित विद्यार्थी दुष्काळ घोषित केलेल्या/अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र या कागदपत्रासह यादीची पडताळणी करण्यासाठी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दिनांक ०६/०१/२०२० ते ०९/०१/२०२० या कालावधीत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथे उपस्थित राहावे.

तरी सदर यादी सादर करताना यादीतील विद्यार्थ्यांची पडताळणी करताना खालील मुद्दे विचारात घ्यावेत.

१ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री करावी.

२ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, विधी) राजर्षि छत्रपती शाहू

महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना या सवलतीखाली ५० टक्के परीक्षा शुल्क देय राहिल.

ज्या विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचे प्रमाणपत्र व दुष्काळ घोषित केलेल्या/अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे अशाच विद्यार्थ्यांची यादी पडताळणीसाठी घेऊन यावी.

तसेच सदर यादीसोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्र सादर करावे.

(हरिभाऊ शिंदे)
वरिष्ट प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या/अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाख मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

सोबत         विद्यार्थ्यांची यादी जोडलेली असुन परीक्षा शुल्क माफीची रक्कम रुपये         एवढी आहे.

स्वाक्षरी

E:\april 18\Exam Fees-19.docx